GRT

GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 9 | MARCH – 2017

# महाराष्ट्रातील राज्यस्तरिय विशेष घटक योजनेमधील सामाजिक व सामुहिक सेवा योजनेचे मूल्यमापन

प्रा. डॉ. महेंद्र गजधाने
के.बी.पी. कॉलेज, पंढरपूर

## प्रस्तावना :–

महाराष्ट्रात राज्यस्तरावर 1982 – 83 पासून 35 जिल्हयांमध्ये विशेष घटक योजना राबविण्यात येत आहे. याच्या अंमलबजावणीवर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालयाचे नियंत्रण असते राज्यस्तरिय योजनेत कृषि व संलग्न सेवा, ग्रामीण विकास, उद्योग व खाणकाम, सामान्य आर्थिक सेवा, सामान्य सेवा व सामाजिक व सामुदिक सेवा अश्या 06 मुख्य योजना व त्या अंतर्गत विविध उपयोजना राबविल्या जातात. यामधील सामाजिक व सामुदिक सेवा हि सर्वात महत्वाची व व्यापक योजना असून या योजनेमुळे अनुसुचित जातीच्या लोकांचा आर्थीक, सामाजिक व शैक्षणिक उर्जा उंचावला आहे. अश्या महत्वाच्या योजनेचा आढावा सदर शोधनिबंधात घेण्यात आला आहे.



## उद्दिष्ट्ये –

1. सामाजिक व सामुहिक सेवा योजनेमधील कार्यक्रमाचा आढावा घेणे.
2. सामाजिक व सामुहिक सेवा योजनेवरील खर्चाचे मूल्यमापन करणे.

## संशोधन पध्दती –

सदर संशोधनासाठी प्रामुख्याने सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील संदर्भ ग्रंथांचा व वार्षीक अहवालांचा आधार घेण्यात आला आहे. प्राप्त माहितीच्या विश्लेषणासाठी सरासरी, टक्केवारी व टक्के बदल या सांख्यिकीय साधनांचा वापर केलेला आहे.

## सामाजिक व सामुहिक सेवा योजनेचे स्वरूप :–

सामाजिक व सामुहिक सेवा योजनेवर 90 टक्के पेक्षा अधिक खर्च करण्यात येतो. यात अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या शैक्षणिक व वस्ती सुधारण्याच्या योजना व कार्यक्रम राबवून त्यांची शैक्षणिक व सामाजिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला जातो. यात अत्याचाराला बळी पडलेल्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटूंबातील व्यक्तींना आर्थिक सहाय्य देणे, सांख्यिकी आधारसामग्रीचे संगणकीकरण (संगणकीकरण कक्ष) करणे, सैनिक शाळेत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे, कर्मवीर पदमश्री दादासाहेब गायकवाड जन्म शताब्दी आणि बक्षिस वितरण, दलित वस्त्यांमध्ये सुधारणा व स्वच्छता राखण्याच्या दृष्टीने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना शाहु, फुले, आंबेडकर दलित वस्ती सुधारणा व स्वच्छता अभियांना अंतर्गत विविध स्तरावर बक्षिसे देणे, सामाजिक न्याय विभागाअंतर्गत चालविल्या जाणाऱ्या मागासवर्गीय मुला–मलींसाठीची वस्तीगृहे, अपंग कल्याण

संस्था, आश्रमशाळा यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्थांना शाहू, फुले, आंबेडकर पुरस्कार देणे, इयत्ता 10 व 12 वी च्या परिक्षेत विशेष उल्लेखनिय यश संपादन करणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थांना राजर्षी छत्रपती शाहु महाराज पुरस्कार प्रदान करणे, अनुसूचित जातींच्या 50 मुलामुलींना परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे, राज्यातील 100 अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना देशातील संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती देणे, इयत्ता 10 वीच्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता 11 वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करणे, अनुसूचित जातींच्या आणि नवबौध्द उमेदवारांना सैनिक व पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण देणे, मागासवर्गीय सुशिक्षीत बेरोजगार तरुणांना व्यावसायभिमुख व कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे, 26 जून राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म दिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करणे, सामुहिक विवाह सोळ्यात सहभागी होवून लग्न करणाऱ्या दाम्पत्याना व संस्थाना कन्यादान योजनेखाली अर्थसहाय्य व अनुदान देणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे मार्फत कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, समाज कल्याण संचालनालयाचे बळकटीकरण करणे, गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देणे, महाड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाचे देखभाल व व्यवस्थापन करणे, मागासवर्गीय शैक्षणिक संस्थांवरील सोयी सुविधा वाढविणे, अनुसूचित जातीच्या मुला–मुलींसाठी शासकीय वस्तीगृहे सुरु करणे व त्यांचे परिक्षण करणे, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठीच्या उपयोजनांची समाजकल्याण संचालनालया मार्फत व्यापक प्रसिध्दी देणे, अनुसूचित जातीच्या मुला–मुलींसाठी नवीन शासकीय निवासी शाळा सुरु करणे, तरुणांना मोटार वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देणे, सहकारी गृहनिर्माण संस्थांना वित्तीय सहाय्य करणे, अनुसूचित जातीच्या मुला–मुलींसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था बांधणे, अनुसूचित जातीच्या मुला–मुलींसाठी शासकीय वस्तीगृहे, निवासी शाळा बांधणे व त्याचा दर्जा सुधारणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाचे प्रत्येक जिल्ह्यात बांधकाम करणे, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचे सबलीकरण व स्वाभिमान योजने अंतर्गत अनुसूचित जाती आणि नवबौध्द भमिहीन शेतमजूरांना जमिनीच्या खरेदी करीता कर्ज देणे, शहरी व ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द कुटूंबांचा निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून पक्के घर बांधून देण्याची रमाई आवास घरकुल योजना सुरु करणे व मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांनी घेतलेल्या कर्जांना हमी देणे यासारख्या योजना व कार्यक्रम राबविले जातात.

## सामाजिक व सामुहिक सेवा योजनेवरील खर्च

सन 2010–11 ते सन 2016–17 या काळात सदर योजनेवर एकूण 12,852.26 कोटी खर्च करण्यात आला असून त्याचा लाभ 1,62,30,898 लाभार्थ्यांना झाला. प्रति लाभार्थी खर्च रू. 7,918.39 इतका आहे.

## संदर्भ :–


1. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र राज्य, विशेष घटक योजना वार्षिक अहवाल.
2. विकासाच्या पाऊल खुणा – महाराष्ट्र राज्य